# प्रसिध्दी पत्रक

फेब्रुवारी, २०१८ या महिन्याकरिता उच्च मूल्य वीजग्राहकांची वीजदेयके लवकर तयार करण्यात येतील. विद्यमान सायकल्स म्हणजे १९ आणि २४ ही पुढीलप्रमाणे चार सायकल्समध्ये विभागण्यात येतील.

सायकल १९ एस मध्ये दक्षिण विभागाचे विद्यमान १९ सायकल्सचे वीजग्राहक समाविष्ट करण्यात येतील.
सायकल २४ एस मध्ये दक्षिण विभागाचे विद्यमान २४ सायकल्सचे वीजग्राहक समाविष्ट करण्यात येतील.
सायकल १९ एन मध्ये उत्तर विभागाचे विद्यमान १९ सायकल्सचे वीजग्राहक समाविष्ट करण्यात येतील.
सायकल २४ एन मध्ये उत्तर विभागाचे विद्यमान २४ सायकल्सचे वीजग्राहक समाविष्ट करण्यात येतील.

फेब्रुवारी, २०१८ या महिन्याकरिता उच्च मूल्य वीजग्राहकांची वीजदेयके दक्षिण विभागातील वीजग्राहकांसाठी मागील महिन्याच्या वीजदेयकापासून अवघ्या १२ ते १४ दिवसांच्या अल्प कालावधीमध्ये आणि उत्तर विभागातील वीजग्राहकांसाठी मागील महिन्याच्या वीजदेयकापासून २५ ते २६ दिवसांच्या कालावधीमध्ये तयार करण्यात येणार आहेत. वीजदेयकांचा दिनांक अशाप्रकारे पुढे आणल्यामुळे तत्पर प्रदान प्रोत्साहन (PPI) दिनांक तसेच वीजदेयक प्रदानाचा नियत दिनांक (Due date) देखील लवकर येणार आहे. यामुळे उच्च मूल्य वीजग्राहकांना होणारा संभाव्य त्रास विचारात घेवून पहिल्या वीजदेयक महिन्याकरिता नियत दिनांकानंतर करण्यात आलेल्या प्रदानाच्या बाबतीत विलंबित प्रदान आकार (DPC) आकारण्यात येऊ नये, असे ठरविण्यात आले आहे. याचा अर्थ फेब्रुवारी, २०१८ या महिन्याच्या वीजदेयकाकरिता प्रदानाचा नियत दिनांक नवीन नियोजनाप्रमाणे विचारात न घेता जुन्या नियोजनानुसार विचारात घेण्यात येईल.

उपक्रमाच्या वीजग्राहकांना होणाऱ्या गैरसोयीबद्दल आम्ही दिलगीर आहोत. याबाबतीत पुढील कोणत्याही स्पष्टीकरणाकरिता वीजग्राहकांनी त्यांच्या संबंधित प्रभागातील ग्राहक सेवा विभागाकडे किंवा उच्च मूल्य वीजग्राहक विभागाकडे संपर्क साधावा, अशी विनंती करण्यात येत आहे.

...................................